**विशेष दिवाणी दावा.क्र.०१/२०२३**
**निशाणी क्र.३८२ पुढे सुरु**

**प्रतिवादी क्र.१५ यांचे साक्षीदार क्र. १ यांची उलट तपासणी वादी तर्फे वकील श्री. डी. आर. देसाई यांचे तर्फे सुरु**

साक्षीदार यांना शपथ देण्यात आली.

प्रतिवादी क्र.१५ तर्फे साक्षीदार तपासणार आहे. परंतु मी प्रस्तुत साक्षीदाराचे नांव सांगू शकत नाही. मी वादी बंसी घाडगे यांना ओळखतो. दावा मिळकत गट क्र.२१२ बाबत मला माहिती आहे. दावा मिळकत गट क्र.२१२ चे क्षेत्र ४ हे. ८६ आर व पोटखराबा ३१ आर आहे. दावा मिळकतीच्या चतु:सिमा मी सांगू शकतो. पुर्वेस —झरे ते खडकेवाडी रस्ता, पश्चिमेस — गट क्र.२१६, दक्षिणेस — गट क्र.२१७ व उत्तरेस — गट क्र.२११ आहेत. गट क्र.२१२ चे मुळ मालक रंगनाथ कुलकर्णी आहेत. रंगनाथ कुलकर्णीला प्रभाकर, गोपाळ आणि विश्वंभर अशी तीन मुले होती. तिन्ही मुलांचे कुटुंब एकत्र कुटुंब होते. तिन्ही मुले मयत आहेत. प्रभाकरच्या पत्नीचे नाव प्रभावती होते. प्रभाकर यांना अपत्य नव्हते. गोपाळ यांना ज्ञानेश्वर हा एक मुलगा आहे. विश्वंभरच्या पत्नीचे नांव सुमनबाई होते. विश्वंभरला चंद्रकांत हा एक मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, रंगनाथच्या मुलांमध्ये दावा मिळकतीचे वाटप झाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, विश्वंभर यांना कॅन्सरचा आजार होवून मयत झाले. साक्षीदार स्वत: सांगतो की, ते वयस्कर व आजारपणामुळे मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की, विश्वभंर यांनी त्यांच्या नावावर असलेली मिळकत त्यांचा मुलगा चंद्रकांत यांच्या नावे केली. त्याबाबत फेरफार क्र.३२८५ नोंदणीकृत झाला.

हे म्हणणे खरे नाही की, गोपाळ कुलकर्णी यांना डायबीटीजचा आजार होवून मयत झाले. गोपाळ कुलकर्णी यांनी त्यांना मिळालेल्या मिळकतीस त्यांचा मुलगा ज्ञानेश्वर याचे नांव लावले. हे म्हणणे खरे नाही की, रंगनाथ कुलकर्णीची मुले झरेमध्ये राहत होते. गोपाळ पुणे येथे रहात होता. परंतु

मला त्याचा पत्ता सांगता येत नाही. प्रभाकर सोलापूर येथे रहात होता. परंतु मला त्यांचा पत्ता सांगता येणार नाही. विश्वंभर वालचंदनगर येथे रहात होते. परंतु मला त्यांचा पत्ता सांगता येणार नाही. वरील तिन्ही व्यक्ती सदरहू ठिकाणी रहात असल्याबाबत माझयाकडे कागदोपत्री पुरावा आहे. सदरचा पुरावा मी दाखल करण्यास तयार आहे.

दिनांक २४.७.१९९७ रोजी प्रभाकर रंगनाथ कुलकर्णी व चंद्रकांत कुलकर्णी यांनी बंसी घाडगे व रावसाहेब पुरुषोत्तम कुलकर्णी यांना गट क्र.२१२ चा साठेखताचा दस्त करुन दिल्याबाबत मला माहित नाही. प्रभाकर कुलकर्णी व चंदकांत यांनी बंसी घाडगे व रावसाहेब कुलकर्णी यांना सदरहू मिळकतीचे खरेदीखत रक्कम रुपये २,५०,०००/—ला करुन देणेबाबत ठरले होते व त्याबाबत साठेखताच्या दिवशी रक्कम रुपये ५०,००० दिलेबाबत मला माहिती नाही. सदरचा साठेखताचा दस्त बॉन्डरायटर केशव वीर यांनी लिहिल्याबाबत व सदर दस्तावर चंद्रकांत व बंसी घाडगे यांनी सहया केल्याबाबत मला माहिती नाही. सदर दस्तावर साक्षीदार म्हणून भागवत गणपत मोरे, गुळवे, गोपाळ रंगनाथ कुलकर्णी व जनार्दन घाडगे यांनी सहया केल्याबाबत मला माहिती नाही.

प्रस्तुत साठेखताबाबतचा मजकुर मी माझया कैफियतीमध्ये व पुराव्याच्या शपथपत्रात नमूद केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुतचा साठेखताचा दस्त मान्य असल्याने त्याबाबतचा उल्लेख मी माझया कैफियतीमध्ये व शपथपत्रामध्ये केलेला नाही. प्रस्तुत साठेखताची माहिती मला झालेली नाही. प्रस्तुत दाव्याची वैयक्तीक माहिती मला दावा दाखल झाल्यानंतर झाली. प्रस्तुतचे साठेखत रदद होवून मिळण्याची मागणी मी कैफियत दाखल केली त्यावेळेस केलेली आहे. मी सदरचे साठेखत रदद होउुन मिळावे याबाबत प्रतिदावा दाखल केलेला नाही.

प्रस्तुत दाव्यातील कैफियत निशाणी ३५७ वर माझया वडिलांची सही आहे. माझया वडिलांनी दाखल केलेली कैफियत स्वीकारणेबाबत मी

न्यायालयात पुरसिस दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत दाव्यामध्ये मी कैफियत दाखल केली नसल्याने मला प्रस्तुत दाव्यात पुरावा दाखल करण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुळ दावा हा निरंतर ताकीद मनाई हुकूमाकरीता दाखल झाला होता. त्यानंतर सदर दाव्यात दुरुस्ती होवून सदरचा दावा हा साठेखतावरुन खरेदीखत होउुन मिळणेकरीता झाला. सदर दुरुस्तीच्या विरोधात मी अपील दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.२४.७.१९९७ ला दावा मिळकतीचे साठेखत झाले तेव्हापासून दावा मिळकत बंसी घाडगे यांच्या कब्जे वहिवाटीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीशी माझे वडिल व माझा काहीही संबंध नाही.

मी रावसाहेब कुलकर्णी यांना ओळखतो. दि.१६.४.१९९८ ला रावसाहेब कुलकर्णी यांनी बंसी घाडगे यांना करारपत्र लिहून दिल्याबाबत मला माहिती नाही. रावसाहेब कुलकर्णी यांनी करुन दिलेल्या करारपत्रान्वये त्यांचा दावा मिळकतीतील हक्क त्यांनी बंसी घाडगे यांच्या हक्कात सोडून दिल्याबाबत मला माहिती नाही. दि.२०.५.१९९८ ला प्रभाकर, ज्ञानेश्वर, चंद्रकांत यांनी बंसी घाडगेच्या हक्कामध्ये वचननामा लिहून दिल्याबाबत मला माहिती नाही. रावसाहेब कुलकर्णी यांनी प्रस्तुत दाव्यामध्ये दावा मिळकतीतील हक्कसोड दिल्याबाबत शपथपत्र दाखल केलेबाबत मला माहिती नाही.

सन १९९७—९८ मध्ये झरेगावची लोकसंख्या दोन हजार असल्याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे साठेखताबाबतची माहिती मला व माझा वडिलांना साठेखतानंतर दोन ते चार दिवसांनी झाली. दिनांक २४.७.१९९७ च्या साठेखतामध्ये साठेखत करुन देणार व घेणार म्हणून माझी अथवा माझया वडिलांची सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९७  मध्ये झालेल्या साठेखतान्वये नारायण साधु घाडगे यांना प्रस्तुत मिळकतीचे खरेदीखत करुन दिल्याबाबत मला माहिती नाही. साठेखतावर प्रभाकर व चंद्रकांत यांनी सहया केल्याबददल माझी तक्रार नाही कारण मला सदर साठेखताबाबत काही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, साठेखता

वि.दि.दावा.क्र. १/२०२३
निशाणी क्र. ३८२

अन्वये बंसी घाडगे यांना दावा मिळकतीचे खरेदीखत करुन मिळू नये म्हणून मी साठेखताबाबत मला माहित नसल्याचे खोटे कथन करत आहे.

**न्यायालयाची वेळ संपल्याने पुढील उलटतपास तहकूब**

श्रवणोत्तर स्विकृत

समक्ष

स्थळ — करमाळा
दिनांक — २०/०४/२०२४.

स्वाक्षरीत/—
दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,
करमाळा.